ग्रंथमालिका ‘धर्माचरण’ : खंड १

# सोळा संस्कार

## आदर्श आणि साधनामय जीवन यांचे बीज !

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**


**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९७, गुजराती ७०, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २५, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १२.३.२०२५ पर्यंत १३१ साधक संत झाले, तर १,०५२ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

# पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---


## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

❀ ◦ ❀ ◦ ❀

## ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे), उपास्यदेवते (स्वतःच्या उपास्यदेवतेचे नाव घ्यावे) आणि गुरुदेवा (गुरु असल्यास), आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे.



# अनुक्रमणिका

(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 मनोगत ७

प्रकरण १. व्युत्पत्ती, अर्थ आणि महत्त्व ८

प्रकरण २. संस्कार कोणाचे आणि कसे करावेत ? १५

२ अ. अधिकार (संस्कार कोणाचे करतात ?) १५

२ आ. पद्धत १५

प्रकरण ३. सोळा संस्कारांचे आधारविधी १९

प्रकरण ४. संस्कार क्र. १ : गर्भाधान (ऋतूशांती) २७

प्रकरण ५. संस्कार क्र. २ ते ४ : पुंसवन, सीमंतोन्नयन आणि जातकम ३३

प्रकरण ६. संस्कार क्र. ५ : नामकरण ३८

प्रकरण ७. संस्कार क्र. ६ ते ८ : निष्क्रमण, अन्नप्राशन आणि चौलकर्म ४७

प्रकरण ८. संस्कार क्र. ९ : उपनयन (व्रतबंध, मुंज) ५१

प्रकरण ९. संस्कार क्र. १० ते १४ : मेधाजनन, महानाम्नीव्र, महाव्रत, उपनिषद्व्रत आणि गोदानव्रत ६८

प्रकरण १०. संस्कार क्र. १५ : समावर्तन (सोडमुंज) ७१

प्रकरण ११. संस्कार क्र. १६ : विवाह ७३

प्रकरण १२. ‘विवाहसंस्कार’ यासंबंधी टीका किंवा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण ९२

卐 प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार ! ९८

卐 संकलकांचा वैज्ञानिकदृष्टीकोन आणि अन्य माहिती १००


हा ग्रंथ ‘इ-बुक’ स्वरूपात उपलब्ध ! : Sanatanshop.com/ebooks

## मनोगत

मनुष्याचा जन्म ईश्वरप्राप्तीकरिता आहे, अशी धर्माची शिकवण असल्याने जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक प्रसंगी ईश्वराच्या जवळ जाण्यासाठी आवश्यक अशी उपासना कशी करावी, याचे मार्गदर्शन धर्मशास्त्रात करण्यात आले आहे. जन्मापासून विवाहापर्यंत जीवनाचे एक चक्र पूर्ण होते. तसेच चक्र पुत्राच्या / कन्येच्या जन्मापासून त्याच्या / तिच्या विवाहापर्यंत असते. असे पिढ्यान्‌पिढ्या चालू असते. गर्भधारणा ते विवाहापर्यंतच्या काळात जीवनात घडणाऱ्या प्रमुख सोळा प्रसंगी ईश्वराच्या जवळ जाण्यासाठी कोणते संस्कार करायचे, त्याचे विवेचन (माहिती) या ग्रंथात दिले आहे. या संस्कारांमुळे पुढे उपासना चांगली व्हावयास साहाय्य होते. संस्कार कसे करायचे, याचे विवेचन ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या संदर्भग्रंथांतून घेतले आहे. या ग्रंथात संस्कारांतर्गत विधींतील प्रत्येक कृती कशी करायची, याचा विस्तृत ऊहापोह करण्यापेक्षा अमुक एक कृती अमुक एका पद्धतीने का करायची, यामागील अध्यात्मशास्त्रीय कारणमीमांसा करण्यावर अधिक भर दिला आहे. त्याने संस्कारांमागील शास्त्र समजण्यास साहाय्य होईल. वर्ण, जाती, उपजाती इत्यादींच्या संस्कारांतील विधींमध्ये काही प्रमाणात पाठभेद असले, तरी त्यामुळे विधींमागचे शास्त्र समजण्यात अडचण येणार नाही. तसेच काही जण मृत्यूनंतर करायच्या संस्कारांनाही सोळा संस्कारांत धरतात. त्या संस्कारांविषयीचे काही विवेचन सनातनच्या ‘मृत्यूनंतरच्या क्रियाकर्माचे शास्त्र’ या लघुग्रंथात केले आहे.

आजकालच्या बुद्धीप्रधान काळातही सर्वांनी संस्कार आणि विधी यांमागील शास्त्र जाणून त्याप्रमाणे ते करून अधिकाधिक ईश्वराच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

(‘अध्यात्मशास्त्र’ या ग्रंथमालिकेतील सर्व खंडांचे सामाईक मनोगत ‘धर्माचे मूलभूत विवेचन’ या ग्रंथात दिले आहे.)

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.